महाराष्ट्र टाइम्स २३/५/०८

# इथे पुन्हा अनुभवा पक्ष्यांची किलबिल, फुलपाखरांची भिरभिर!

● धनेश पाटील

खंड्या, वॅबलर, बॅबलर, शँक, गल्स, सॅण्डपायपर, फ्लेमिंगोज, आयबीस, स्पूनबील्स, डव्ज... असे पाच-दहा नव्हे तर तब्बल दीडशे पक्षी... एव्हेसिनीआ मरीना, एक्झोकारीआ अकोलेका, सोनरेशिआ अल्बा.. अशा विविध जातींचे मॅनग्रोव्ज... या हिरव्यागार झाडांच्या गर्दीत बागडणारी विविध जातींची फुलपाखरं... अन् या निसर्गाच्या ठेव्यात नव्याने उभी केली जाणारी महाराष्ट्रातील जवळजवळ सर्व जातींच्या औषधी झाडांची बाग, मरीन ॲक्वेरिअम सेण्टर, बटरफ्लाय गार्डन, इथल्या निसर्गाच्या अभ्यासासाठीचं संशोधन केंद्र... निसर्गवेड्यांना साद घालणारं असं बरंच काही नवी मुंबईच्या वेटलॅण्ड पार्कमध्ये लवकरच अनुभवायला मिळणार आहे.

खारफुटी जंगलांच्या संवर्धन आणि संरक्षणासाठी नवी मुंबईत लवकरच हाँगकाँगच्या मायपो नेचर रिझर्व्ह आणि सिंगापूरच्या सुंगई बुलो या प्रोजेक्ट्सच्या धर्तीवर मॅन्ग्रोव्ज वेटलॅण्ड सेण्टर उभारण्यात येणार आहे. वन विभाग, सिडको आणि संवर्धन कृती विश्वस्त मंडळ (सीएटी) यांच्यात अलीकडेच यासंदर्भात सामंजस्य करार झाला. नवी मुंबईतील नेरूळ, सारसोळे आणि सोनखार या गावांत २८९ हेक्टर इतक्या विस्तृत क्षेत्रावर हे सेण्टर उभारलं जाणार आहे.

या प्रोजेक्टबद्दल सेण्टरचे प्रोजेक्ट डायरेक्टर आणि पर्यावरण अभ्यासक विवेक कुलकर्णी म्हणाले की, नवी मुंबईचा विस्तार पाहता इथल्या खाडीला खेटून उभ्या असलेल्या कारखानदारीमुळे तसंच इथे वाढत असलेल्या इमारतींच्या जंगलांमुळे खाडीच्या पाण्याची स्थिती दयनीय झाली आहे. इथल्या पाण्याची गुणवत्ता टिकवून ठेवून त्या पाण्यावर जगणाऱ्या खारफुटीची (मॅन्ग्रोव्ज) उंची वाढवणं, हे या वेटलॅण्ड सेण्टरचं प्रमुख उद्दिष्ट आहे. नवी मुंबईच्या परिसरात सध्या सहा प्रकारच्या खारफुटी अजूनही तग धरून आहेत. तर, काही इथून नामशेष झाल्या आहेत. या अस्तित्व गमावलेल्या झाडांची इथे पुन्हा लागवड केली जाणार असून तिथे येणाऱ्या विविध पक्ष्यांसाठी नैसर्गिक निवारे उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

इथली हिरवळ वाढल्यास इथे विविध पक्षी पुन्हा आकर्षित होतील. एकेकाळी इथे सुमारे दीडशेहून अधिक तर पाणथळ जागी आढळणारे ९० प्रजातींचे पक्षी दिसायचे. या साऱ्यांना इथे खाद्य उपलब्ध व्हावं, म्हणून इथे असलेली तळीही पुन्हा जिवंत करण्यात येणार आहेत. याशिवाय संपूर्ण महाराष्ट्रात सापडणारं विविध औषधी झाडांचं एक मेडिसिनल गार्डन, तर फुलपाखरांसाठी बटरफ्लाय गार्डन तयार करण्यात येणार आहे.

या सेण्टरच्या उभारणीसाठी सध्या १५ जणांची टीम कामाला लागली असून रिसर्च को-ऑर्डिनेटर म्हणून डॉ. अमोल पटवर्धन आणि डॉ. अंजली हेरेडिआ तर एज्युकेशन हेड म्हणून शीतल चौधरी यांची मोलाची साथ लाभत असल्याचं कुलकर्णी म्हणाले. या सेण्टरमुळे इथल्या स्थानिक रहिवाशांना स्वयंरोजगार उपलब्ध होणार असून सेण्टरला दरवर्षी पाच लाख निसर्गप्रेमी भेट देतील, अशी अपेक्षा आहे. या निसर्गप्रेमींना इथल्या संपत्तीविषयी माहिती देण्यासाठी इथे इन्स्ट्रक्टर तसंच शिक्षकांचं ब्रिगेड तत्पर असेल, असंही कुलकर्णी म्हणाले. हे सेण्टर पुढील तीन वर्षात लोकांसाठी खुलं होणार आहे.

mumbaitimes@indiaitmes.com



